अस्सल सोलापुरी

# सुराज्य सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । मंगळवार, दि. २० फेब्रुवारी २०२४ । वर्ष : २२ वे अंक : १४२ वा किंमत : ५ रुपये पाने ८

## अफगाणिस्तानच्या नूरिस्तानमध्ये भीषण भूस्खलनात २५ ठार

**अफगाणिस्तान** : अफगाणिस्तानच्या नूरिस्तान प्रांतात भूस्खलनामुळे सुमारे २५ जणांचा मृत्यू झाला आहे. नूरगाराम जिल्ह्यात भूस्खलनामुळे सुमारे १० जण जखमी झाल्याचे वृत्त आहे. माहिती आणि दळणवळण प्रमुख मोहम्मद अब्दुल्ला जान यांनी या घटनेची माहिती देताना सांगितले की, मुसळधार पावसामुळे नूरगाराम जिल्ह्यातील नाकारा गावात अनेक डोंगर घसरले आहेत. त्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. सुमारे १५ ते २० घरांना या नैसर्गिक आपत्तीचा फटका बसला आहे. नुकत्याच झालेल्या पावसामुळे नूरिस्तान, कुनार आणि पंजशीर प्रांतातील रस्ते बंद झाले आहेत, अशी माहिती संपर्क प्रमुखांनी दिली.

## महेंद्रसिंग धोनी ठरला इतिहासातील सर्वोकृष्ट कर्णधार



**मुंबई** : भारतीय क्रिकेट टीमचा माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनीला आयपीएलच्या इतिहासातील सर्वोकृष्ट संघाचा कर्णधार ठरवण्यात आले आहे. आयपीएल २००८ मध्ये सुरु झाला. आयपीएलच्या यशाचे सेलिब्रेशन करण्यासाठी माजी क्रिकेटपटूंनी हा संघ बनवला आहे. २० फेब्रुवारीला आयपीएलच्या पहिल्या निलावाला १६ वर्षे पूर्ण होणार आहेत. याच निमित्ताने स्ट्रार स्पोर्ट्सने आजवरच्या सर्वो कृष्ट टीम बनवली आहे. जवळपास ७० पत्रकारांच्या साहाय्याने टीम बनवली आहे.

# सोलापुरातील डान्सबार शौकीनांना पाचगणीत 'खत'पाणी

## पाचगणी टेन्टवर छाप्यात सोलापूर जिल्ह्यातील खतविक्रेत्यांवर गुन्हा दाखल

सातारा, सोलापूर/प्रतिनिधी

**पाचगणी-खिंगर येथील पाचगणी टेन्ट हाऊसवर बारबाला नाचवल्याप्रकरणी १० ते १२ बारबालांसह सोलापूर जिल्ह्यातील २४ बी बियाणे विक्रेताडीलर असे एकूण ३५ ते ३६ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सातारा पोलीस अधीक्षक समीर शेख व अ‍ॅडिशनल एसपी आचल दलाल यांनी या पाचगणी टेन्ट हाऊस रिसॉर्टवर छापा टाकून कारवाई केली. या घटनेनं सातारा जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. यामध्ये पाचगणी टेन्ट हाऊस रिसॉर्टचे मालक डॉ. विजय दिघे आंबेघर (ता. जावळी) यांनाही पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.**



काल रात्री साडेदहा ते अकरा वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी पाचगणी टेन्ट हाऊस रिसॉर्टचे मालक डॉ. विजय दिघे यांना देखील पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. रात्री उशिरापर्यंत पाचगणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. दोन महिन्यापूर्वी देखील पाचगणी येथीलच कासवंड येथे स्प्रिंगव्हॅली या रिसॉर्टवर देखील अशाच पद्धतीच्या बारबाला नाचवल्या गेल्या होत्या. यामध्ये सातारा जिल्ह्यातील प्रसिद्ध पाच डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर सातारा पोलीस अधीक्षक समीर शेख यांची पाचगणी येथील पाचगणी टेन्ट हाऊस या रिसॉर्टवर मोठे कारवाई मानली जात आहे. काल रात्री साडेदहाच्या सुमारास सातारा पोलीस यांची टीम या रिसॉर्टवर पोहोचली. या रिसॉर्टवर सुरू असणाऱ्या छमछमवर सातारा पोलिसांनी छापा टाकला.

यामध्ये रिसॉर्टच्या आत असणाऱ्या १२ बारबाला व सोलापूर जिल्ह्यातील कृषी खत विक्री व्यवसायिक असे एकूण ३६ जणांना पोलिसांनी चौकशी करून ताब्यात घेतलं आहे. बाकी काही खत विक्री व्यवसायिक व बारबालांसह डान्स करणारे पाच ते सहा जण घटनास्थळावर आलिशान गाड्या सोडून पळून गेले असल्याची माहिती मिळाली. त्यांचाही पोलीस शोध घेत आहेत.

### गाड्या सोडून काही जण पळाले

पाचगणी फिंगर येथील पाचगणी टेन्ट हाऊस वर वीस ते पंचवीस जणांची मध्य धुंद पार्टी सुरू होती पाचगणी टेन्ट हाऊस च्या वरच्या मजल्यावर तळमजल्यात महागड्या कंपनीच्या दारूच्या बाटल्या व डान्सबार सारखी बैठक व्यवस्था होती. पोलिसांना बघतात यातील बरेच लोक पळून देखील गेली घटनास्थळावर सोलापूर जिल्ह्यातील खत व्यवसायिक व कृषी खत व्यवसायातील कंपन्यांमध्ये काम करणारे काही एजंट व डान्स करणाऱ्या दहा ते बारा नर्तिका व २५ खत व्यवसाय असे एकूण ३७ जणांची सातारा पोलिसांनी चौकशी केली तपासणी केली बरेच जण जण दारूच्या नशेत नर्तिकांच्या समोर झिंगत असतानाच रंगेहात पोलिसांना सापडले पोलिसांनी कारवाई करत १२ महिला त्यांच्यासमवेत नाचणाऱ्या २५ जण व पाचगणी टेन्ट हाऊस चे मालक डॉक्टर विजय दिघे असे बारा बारा सह एकूण ३७ जणांवर कारवाई करण्यात आली पाचगणी पोलीस पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे

### आरोपींची नावे

१) भैरवनाथ चंद्रभान चवरे (पेनुर तालुका मोहोळ), २) डॉक्टर विजय रघुनाथ दिघे (रा. आंबेघर तालुका जावळी) ३) पाचगणी टेन्ट हाऊस रिसॉर्ट मालक गिरीश एकनाथ दिघे (रा. आंबेघर तालुका जावळी मॅनेजर), ४) दत्तात्रय काशिनाथ भोसले (खवणी तालुका मोहोळ) विठ्ठल शिवलिंग साखरे (नजीक पिंपरी तालुका मोहोळ), ५) सचिन सुधाकर वाळूकर (रा. अवंतीनगर, सोलापूर), ६)नवनाथ अरुण देवकते (रा. धारुणी, तालुका माळशिरस) ७) विश्वजीत कांतीलाल यलमार (रा. सुपली, तालुका पंढरपूर) ८) आप्पा वसंत हेलकर (रा. मोहोळ), ९) गणेश हनुमंत करणावर (रा. मोहोळ) १०) रवी भैस खानट (रा. खानट वस्ती, करमाळा), ११) बाळासाहेब बाबुराव सलगर (रा. निम्बर्गी), १२) सदानंद विठ्ठल देवकते (रा. सादेपूर), १३)विलास बाळासाहेब चव्हाण (रा. औरंगपूर निपाणी देवराई), १४)अण्णा नाना पडवळकर (रा. आटपाडी जिल्हा सांगली), १५) प्रदीप बाबू खांडेकर (रा. शेंदुगेवाडी मालवणी पंढरपूर), १६) कैलास रामचंद्र गुर्वे (रा. साळवेश्वर तालुका मोहोळ), १७) विजय श्रीमंत नागणे (रा. कोंढारकी मुंढेवाडी), १८) महेश दत्तात्रय खरात (रा. सोनके, पंढरपूर), १९) अनिल तुकाराम विभुते (रा. सुपली, पंढरपूर), २०) नंदकुमार श्रीरंग शिंदे (रा. मोहोळ), २१)सुरज दिगंबर कुंभार (रा. वाके शिवनी)

# मराठा आरक्षणाचा आज फैसला

## सग्यासोयऱ्यांवर समाजबांधव ठाम; सरकारची मात्र स्वतंत्र आरक्षणाची तयारी

## सोलापूर जिल्ह्यातील मराठ्यांच्या नजरा आमदारांच्या भूमिकेवर

- मराठा आरक्षणासाठी विधिमंडळाचे आज विशेष अधिवेशन
- आरक्षणाला पाठिंबा न देणाऱ्या ताकद दाखविण्याची तयारी, अंतरवालीत सराटीतही होणार हालचाली

सुराज्य/खास प्रतिनिधी

**मराठा आरक्षणासाठी राज्य विधिमंडळाचे एक दिवसाचे विशेष अधिवेशन आज मुंबईत बोलविण्यात आले आहे. दरम्यान, या अधिवेशनात सोलापूर जिल्ह्यातील अकरा आमदार काय भूमिका घेतात? नेमके कोणते आमदार आरक्षणाच्या बाजूने तर कोण विरोधात जाणार? याकडे जिल्ह्यातील मराठा समाजाचे लक्ष आहे. मराठ्यांना आरक्षण देण्याच्या पार्श्वभूमीवर, जे कोणी आमदार विरोधात जातील, त्यांना या समाजाची किंमत दाखविण्याची तयारदेखील समाजबांधवानी केली.**


विशेषत्वे, या अधिवेशनात मराठ्यांना स्वतंत्र १३ टक्के आरक्षण देण्याचा ठराव घेण्यासह ज्यांच्या कुणबी नोंदी निघाल्या आहेत, त्यासंबंधितांच्या सग्यासोयऱ्यांनादेखील कुणबी प्रमाणपत्र देण्याचा मसुदा यापूर्वीच तयार करण्यात आला आहे. त्याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय आजच्या अधिवेशनादरम्यान घेतला जातो का, यावर सगळ्यात जादा कटाक्ष मराठा बांधवांना आहे. सग्यासोयऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय नाही झाल्यास, आंदोलनाची पुढची दिशा सकल मराठा आरक्षण मागणीचे केंद्र झालेल्या अंतरवाली सराटीत ठरणार असल्याचे आरक्षणाचे प्रवर्तक मनोज जरांगे-पाटील यांनी यापूर्वीच जाहीर केले आहे.

जरांगे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली आरक्षणाच्या आग्रही मागणीवर राज्यातील एकवटलेला मराठा समाज आणि राज्य मागास वर्ग आयोगाचा अहवाल या पार्श्वभूमीवर, हे अधिवेशन बोलविण्यात आले आहे. घटनेच्या १०५ कलमात दुरुस्ती करून या समाजाला टिकणारे साधारण १३ टक्के आरक्षण देण्याचा ठराव पारित करण्यासाठी आज अधिवेशन होत आहे. कोणत्याही समाजा च्या आरक्षणाला धक्का न लागता आरक्षण देण्याचा निर्णय होणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले आहे. तीच भूमिका उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांची आहे.

मराठा समाजाला आरक्षण देण्याला कोणते आमदार पाठिंबा दर्शवतात, यावर लक्ष ठेवण्याबद्दल आरक्षणाचे नेते जरांगे-पाटील यांनी मराठा बांधवांना सांगितले आहे. त्यादृष्टीने सोलापूर जिल्ह्यातील कोणते आमदार आरक्षणाला उघड पाठिंबा देतात, कोणत्या आमदारांचा विरोधी कल असेल हे पाहिले जाणार आहे.




### सग्यासोयऱ्यांच्या अधिसूचनेच्या अंमलबजावणीवर जरांगे ठाम



कुणबी नोंदी निघालेल्यांच्या सग्यासोयऱ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या पार्श्वभूमीवर, सरकारने अधिसूचना काढली आहे. संबंधितांना तशी प्रमाणपत्रे देण्याबद्दल कबुली दिली आहे. या काढलेल्या अधिसूचनेवर आलेल्या हरकती व सूचना फेटाळण्याचा अधिकार सरकारला आहे. काढलेल्या अधिसूचनेची अंमलबजावणी करण्याचा निर्णय आजच्या अधिवेशनात सरकारने घ्यायला हवा. यासंबंधी निर्णय न घेतल्यास आंदोलनाची दिशा लगेच २१ फेब्रुवारीला ठरणार असल्याचे श्री. जरांगे-पाटील यांनी आज ( ता.१९ ) सांगितले. अधिवेशन घेऊन देण्यात येणारे आरक्षण टिकेल की नाही, ज्यांना कोणाला ते घ्यायचे असेल त्यांनी घ्यावे. मात्र, कुणबी नोंदी आणि त्या आनुषंगिक, सग्यासोयऱ्यांना ओबीसीमधूनच आरक्षण घेण्यावर आपण ठाम आहोत, असेही त्यांनी सांगितले.


### भाजप आणि मराठा आमदारांवर अधिक लक्ष

आरक्षणाचा विचार करता सत्ताधारी भाजप हे ओबीसी समाजमनासोबत आहे. मराठ्यांच्या आरक्षणाला त्यांचा उघड उघड विरोध नसला तरी आतून त्यांचा सपोर्ट ओबीसींना असल्याचे मत मराठा समाजाचे आहे. हे लक्षात घेता सोलापूर जिल्ह्यातील भाजप आणि राज्यातील सत्तेसाठी त्यांना समर्थन दिलेल्या सहयोगी आमदारांचा विचार करता,आमदार सुभाष देशमुख, विजयकुमार देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, समाधान अवताडे, राम सातपुते, राजेंद्र राऊत, संजय शिंदे, राम सातपुते, समाधान अवताडे यांच्या आरक्षणासंबंधीच्या भूमिकेवर समाजाचे लक्ष आहे.

### आजवर मराठ्यांच्या जीवावर राज...मग आता काय?

जिल्ह्यात गावोगावी अगदी मोठ्या संख्येने असलेल्या मराठा समाजाने अगदी विकास सोसायटी सदस्य, ग्रामपंचायत सदस्यापासून ते आमदार, खासदार पदापर्यंत खुद्द आपल्या मराठा समाजाच्या चेहऱ्यांच्या पाठीशी प्रत्येक निवडणुकीवेळी ताकद लावली. ओबीसीसह इतर सर्वच समाज घटकांना निवडणुकीवेळी समर्थन देत सत्तेमधील पदे मिळविण्याला मराठ्यांनी सहकार्य केले. मराठ्यांच्या जिवावरच संबंधितांचे 'राज' आजवर राहिले. आता या समाजाच्या आरक्षणाच्या महत्त्वाच्या वेळी दस्तुरखुद्द मराठा समाजातील आमदारांसह अन्य समाजाच्या आमदारांनीदेखील आपले समर्थन द्यायला हवे.

कुणबी नोंदी सापडलेल्यांसह त्यांच्या सग्यासोगऱ्यांना ओबीसीतूनच आरक्षण मिळण्यासंबंधी पहिल्यांदा मराठा समाजाच्या आमदारांनी समर्थन देण्याची भूमिका घ्यायला हवी. कारण हा समाजाचा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. मराठा समाजाच्या नेत्यांना त्यांचे राजकारण, सत्तेमधील पदे हे सगळे अबाधित ठेवायचे असेल, तर मराठा समाजामनासोबत या. आरक्षणाला समर्थन देऊन प्रयत्न करा. पक्ष, पद हे बाजूला करून समाजाच्या आरक्षणाचे हित बघा. तसा विचार नसेल तर मग मराठ्यांची मतांची गरज नाही का? शिवाय मराठ्यांच्या मतांच्या जोरावर इतर समाजातील ज्यांना ज्यांना आमदारकी मिळाली, त्यांनीपण मराठ्यांना आरक्षण मिळण्याचीवेळी नैतिकता म्हणून आपले स्पष्ट समर्थन द्यावे.



**- दास शेळके,**
नेते मराठा समाज, सोलापूर

### 'या' आमदारांचे ठरले..इतरांचे काय?

मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या भूमिकेवर आमदार विजयकुमार देशमुख तसेच सुभाष देशमुख, आमदार प्रणिती शिंदे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. मराठा समाजाच्या भावनांसोबत आपण असल्याचे त्यांनी यापूर्वीच सांगितले आहे. तथापि, आमदार समाधान अवताडे (मंगळवेढा-पंढरपूर), राजेंद्र राऊत (बार्शी) बबनराव शिंदे (माढा), संजय शिंदे (करमाळा), शहाजी पाटील (सांगोला) राम सातपुते (माळशिरस), यशवंत माने (मोहोळ), सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) संबंधित आमदारांची भूमिका काय असेल, याकडे लक्ष आहे.

## मुस्लिम पाच्छा पेठेत दगडफेक, कारच्या काचा फोडल्या

### १० जणांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

मुस्लिम पाच्छा पेठेत राहणारे मुजमील जमादार यांच्या अर्पाटमेंट समोर रविवारी रात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास मोटारसायकल वरून आलेल्या ८ ते १० जणांनी दगडफेक केली. यामध्ये दोन तीन दुकाने व कार फोडण्यात आली.

यामध्ये कारचे ८ हजारांचे नुकसान झाले. या प्रकरणी अनोळखी ८ ते १० जणांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणी मुजमील इक्बाल जमादार (वय ३७ रा. मुस्लिम पाच्छा पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. यात म्हटले आहे की, १८ फेब्रुवारी रोजी रात्री १२.३० वाजण्याच्या सुमारास मोटारसायकल वरून आलेल्या ८ ते १० जणांनी दंगा करण्याच्या उद्देशाने दगडफेक करण्यास सुरूवात केली. या दगडफेकींत जमादार यांच्या कारच्या पुढील व मागील बाजूच्या काचा फुटून नुकसान झाले.

या प्रकरणी अनोळखी ८ ते १० जणांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सोनवणे हे करीत आहेत.

## मळोली ३ घरफोड्या; ६७ हजारांचे दागिने गायब

सुराज्य/सोलापूर




एकाच रात्री ३ ठिकाणी बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने रोख रक्कम आणि दागिने आदी ६७ हजाराचा ऐवज पळविले. ही धाडसी चोरी मळोली (ता. माळशिरस) येथे रविवारी पहाटेच्या सुमारास घडली.

याप्रकरणी शरद ज्ञानेश्वर जाधव (रा. मळोली) यांनी वेळापूर पोलिसात दाखल केली. चोरट्याने त्यांच्या स्वतःचे तसेच त्यांच्या घराच्या काही अंतरावर राहणारे गणेश केशवदास जाधव आणि दादासाहेब खुळे यांच्या बंद घराचे कुलूप तोडले. आणि १८ ग्रॅम सोन्याचे दागिने, २१ हजार रुपये रोख आणि इतर चांदीचे वस्तू चोरून नेले. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. हवालदार भोसले पुढील तपास करीत आहेत

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



जाणारा हिवाळा, येणारा उन्हाळा, त्यात छत्रीचा सहारा!

कल्याण
446-44-266

मुंबई
160-70-145

## मळोलीत कुऱ्हाडीने मारहाण; आई, मुलगा जखमी

### दोघांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

समाईक बांधावरील झाडे तोडल्याचा जाब विचारल्याच्या कारणावरून कुऱ्हाडीने केलेल्या मारहाणीत आई आणि मुलगा असे दोघे जखमी झाले. ही घटना मळोली (ता. माळशिरस) येथे शनिवारी सायंकाळच्या सुमारास घडली . या प्रकाणी वेळापूरच्या पोलिसांनी एका महिलेसह दोघाविरुद्ध पुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात जखमी झालेले आनंद विठ्ठल जाधव (वय २७ रा.मळोली) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. ते त्यांची आई जयश्री यांच्यासोबत शेताच्या बांधावर बसले होते. त्यावेळी सचिन शंकर मासाळ आणि यशोदा शंकर मासाळ हे त्यांच्या जवळ आले. त्यांना झाडे तोडण्याबद्दल विचारणा का केली ? असे म्हणत कुऱ्हाडीने मारले. त्यात आनंद जाधव जखमी झाले. तर यशोदा मासाळ हिने केसाला धरून लाथाबुक्क्याने मारहाण केली. त्यात त्यांची आई जयश्री जखमी झाल्या. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. जखमींवर उपचार करण्यात आले. हवालदार भोसले पुढील तपास करीत आहेत.





सोलापूर : शहरात शिवजयंती सोमवारी उत्साहात साजरी करण्यात आली. मध्यवर्ती मंडळाच्या मिरवणुकीत मोठ्या संख्येने नागरीक सहभागी झाले होते. डी.एम.मंडळाच्या देखावा सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.

(संबंधीत वृत्त आतील पानात)